# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**चुनाभटी (मुंबई उपनगर) येथे ए.एच. वाडीया ट्रस्ट यांच्या मालकिच्या असलेल्या विविध भूखंडाबाबत**

**(१) १२२०८ (०७-०४-२०१५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चुनाभट्टी, (मुंबई उपनगर) येथील विविध भूखंडाचे ए.एच. वाडीया ट्रस्ट हे मूळ मालक असून त्या भूखंडाचे नगर भूमापन मालमत्ता पत्रकात ईमला मालकांचे नावे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ए.एच.वाडीया ट्रस्ट काही ईमला मालकांकडून भाडे स्विकारते व काही ईमला मालकांकडून भाडे स्विकारत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ए.एच. वाडीया ट्रस्ट सदर ठिकाणचे भूखंड परस्पर विकासकांना विकत आहेत, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, येथील रहिवाशी बेघर होऊ नयेत म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) चुनाभट्टी येथील विविध भूखंडाचे ए.एच. वाडिया ट्रस्ट हे मूळ मालक असून त्यापैकी काही भूखंडांचे नगर भूमापन मालमत्ता पत्रकात ईमला मालकांची नावे दाखल आहेत.

(२) ए.एच.वाडिया ट्रस्ट ईमला मालकांकडून भाडे स्विकारीत नाही.

(३) ए.एच.वाडिया ट्रस्ट सदर ठिकाणचे भूखंड परस्पर विकासकांना विकत नाही. भूखंडांची विक्री धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीने केली जाते.

(४) भूखंडावर वास्तव्याला असलेले न्यासाचे भाडेकरु/ झोपडीधारक यांच्या हक्काचे संरक्षण मुंबई भाडेकरु अधिनियम/ झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियम मधील तरतुदींद्वारे होत असल्याने भूखंड विक्रीची परवानगी देताना, ती मालमत्ता व तिचे हस्तांतरण या संदर्भातील अस्तित्वातील कायद्यांमधील तरतुदींच्या अधीन राहून विक्रीची परवानगी दिली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेरोजगारांची समस्या सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्याबाबत**

**(२) ४२००१ (०६-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्ह्याच्या मानखुर्द-शिवाजी नगर विधानसभा क्षेत्रातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण तसेच बेरोजगारांच्या समस्या लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पद्धतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्याची मागणी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान बेरोजगार सेवाभावी संस्था यांनी लेखीनिवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती निर्णायक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सागरी पोलीस प्रशिक्षण संस्था गुजरात राज्यात हस्तांतरीत होणार असल्याबाबत**

**(३) ५८२२५ (२३-०८-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी सन २०१३ मध्ये तत्कालीन राज्य शासनाने मंजूर केलेली "सागरी पोलीस प्रशिक्षण संस्था" केंद्र शासनाव्दारे गुजरात राज्यात हस्तांतरीत होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प हस्तांतरीत होऊ नये यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०९-२०१८) :** (१) महाराष्ट्र शासनाने कोणतीही सागरी प्रशिक्षण संस्था मंजूर केलेले नव्हती. त्यामुळे महाराष्ट्रातील संस्था केंद्र शासनाद्वारे गुजरात राज्यात हस्तांतरीत होणार आहे, ही बाब वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अचलपूर मतदार संघातील चांदूर बाजार व अचलपूर तालुक्यातील गावांमध्ये नागरी सुविधा केंद्र सुरु करण्याकरिता परवानगी देण्याबाबत**

**(४) ७१२६४ (२७-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदार संघातील चांदूर बाजार व अचलपूर तालुक्यातील गावांमध्ये नागरी सुविधा केंद्र सुरु करण्याकरिता परवानगी देण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास सचिव आणि संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय यांचेकडे लेखी पत्र देवून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०९-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) माहिती तंत्रज्ञान विभाग, शासन निर्णय, क्रमांक:-मातंस-१७१६/ प्र.क्र.५१७ /का.३९, दि. १९.०१.२०१८ अन्वये आपले सरकार सेवा केंद्र केंद्राबाबत केंद्र शासनाच्या CSC २.० अतंर्गत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.या शासन निर्णयान्वये आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्याकरिता परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सुक्ष्म वित्तीय कंपन्याच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी शोधसमिती स्थापन केल्याबाबत**

**(५) ९०६४३ (०४-०९-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुक्ष्म वित्तीय (मायक्रो फायनान्स) कंपन्याच्या कारभाराबाबत असंतोष पसरलेला असून या कंपन्या गरीबांना विनातारण वाटेल तशी कर्जे देत असून अधिक व्याजदराने कर्ज वसुलीसाठी या कंपन्या कोणत्याही थराला जात असल्याचे दिसून येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपन्या विरोधातील आरोपांच्या चौकशीसाठी शासनाने संयुक्त शोधसमिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार सुक्ष्म वित्तीय कंपन्याविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१), (२) व (३) राज्यातील मायक्रोफायनान्स कंपन्यांच्या विनातारण कर्ज वाटपाबाबत चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली व विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या सहअध्यक्षतेखाली एक प्रशासकीय समितीची स्थापना शासन निर्णय दि.१२/४/२०१७ व दि.०३/०८/२०१७ अन्वये स्थापना करण्यात आली आहे. सदरहू समितीने त्यांचा अहवाल दि.२४/०५/२०१८ रोजी शासनास सादर केला असून समितीने सादर केलेल्या अहवालाची छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील नोंदणीकृत कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना कल्याणकारी योजनांचा लाभ देणेबाबत**

**(६) ९५०९१ (०६-०१-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात ५ हजार ५१५ कामगारांनी नोंदणी केलेली असल्याची बाब दिनांक ५ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोंदणीकृत कामगारांना विविध योजनांचा लाभ मिळणे बाबतची अनेक प्रस्ताव संबंधीत विभागाच्या अपुऱ्या कर्मचा-यांमुळे प्रलंबीत राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्तबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर नोंदणीकृत कामगार व त्यांच्या कुटुंबीयास विभागाच्या विविध योजनांचा लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१९-०९-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ अखेर सरकारी कामगार अधिकारी, बुलढाणा कार्यालयांतर्गत एकुण ६३८६ बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

दिनांक ३१ मे २०१८ पर्यंत मंडळांतर्गत विविध योजनांद्वारे ३०११ लाभार्थ्यांना एकूण १ कोटी ६५ लाख ८६ हजार ३०० एवढ्या रक्कमेच्या लाभाचे वाटप करण्यात आले असून उर्वरीत लाभार्थ्यांना लाभ वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बलायदुरी (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथील 'रेन फॉरेस्ट' या हॉटेलवर पोलीसांनी टाकलेली धाड**

**(७) ९९६३५ (०६-०१-२०१८). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बलायदुरी (ता.इगतपूरी, जि.नाशिक) येथील 'रेन फॉरेस्ट' या पंचतारांकित हॉटेलमध्ये रात्री धाड टाकून दिनांक ३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मद्यपान केलेल्या अवस्थेत अर्धनग्न अश्लील डान्सपार्टी करणा-या युवकांसमवेत सात तरुणींना इगतपूरी पोलीसांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातील काही मुली अल्पवयीन आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बलायदुरी येथील रेन फॉरेस्टमध्ये लावणीच्या नावाखाली अश्लिल नृत्य करणा-या पार्टीसाठी पोलीस प्रशासन व प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेतली होती काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) सदर बाबत परवानगी घेण्यात आलेली नाही.

(४) होय.

(५) सदर प्रकरणी इगतपुरी पो.स्टे.येथे गु. र. नं. ४१/२०१७ भा.दं.वि.कलम २९४,३४ मुं.पो.का. चे कलम ११०,११२,११७ सह द महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ डिग्नीटी ऑफ वूमन्स ॲक्ट २०१६ चे कलम ३ तसेच लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२, सह पोक्सो चे कलम १२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्याचा तपास करून आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.

(६) विलंब झालेला नाही.

---

**मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील हुक्का पार्लरवरील कारवाईबाबत**

**(८) १००१५२ (०६-०१-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील हुक्का पार्लरवर दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास कारवाई करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई उपनगरातील आणखी किती हुक्का पार्लरवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) तसेच मुंबई शहरातील हुक्का पार्लरवर कायमस्वरुपी बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१८) :** (१) होय.

(२) बृहन्मुंबई शहरामध्ये सन २०१७ व सन २०१८ मध्ये कोट्पा कायदा, २००३ अन्वये पोलीसांकडून खालीलप्रमाण कारवाई करण्यात आलेली आहे.

| वर्ष | कारवाई संख्या | अटक आरोपी (गिऱ्हाईक) |
|---|---|---|
| २०१७ | १६०९ | ८०९५ पुरुष<br>६२० महिला |
| २०१८ | ४०१ | १४५३ पुरुष<br>४१२ महिला |

(३) हुक्का पार्लरवर बंदी आणण्यासाठी सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व व्यापार वितरण यांचे विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ या विधेयकास विधीमंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाकडे सदर विधेयकास मा.राष्ट्रपती महोदयांची मान्यता मिळणेबाबत विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेतकरी आत्महत्येचा तपास आठवड्यात पूर्ण करण्याबाबत पोलीस प्रशासनास मिळालेल्या सूचना

**(९) १००५८३ (०६-०१-२०१८). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला तात्काळ मदत मिळावी यासाठी शेतकरी आत्महत्येचा तपास आठवड्यात पूर्ण करण्याच्या सुचना शासनाने पोलीस प्रशासनास दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) होय. शासन परिपत्रक दिनांक १६.०९.२०१७ अन्वये आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला तात्काळ मदत मिळावी यासाठी शेतकरी आत्महत्येचा तपास पूर्ण करण्याबाबतच्या सूचना शासनाने पोलीस प्रशासनाला दिलेल्या आहेत. तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दि.३०.०३.२०१६ व ३०.११.२०१६ अन्वये पोलीस घटकांना सूचना दिलेल्या आहेत.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्याकरिता खालील बाबी लक्षात घेतल्या जातात :-

१. शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास त्या अकस्मात मृत्यूचा तपास पोलीस उपनिरिक्षक किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या अधिकाऱ्यांनी करावा.

२. तसेच शव शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनाकरिता पाठविण्यापूर्वी सदरची आत्महत्या ही शेतकरी आत्महत्या असल्याचे स्पष्ट नमूद करावे व शवविच्छेदनाचा अहवाल तातडीने मिळणेबाबत रुग्णालयाकडे पाठपुरावा करावा.

३. संबंधीत शवाबाबतचा व्हिसेरा तसेच इतर जप्त करण्यात आलेल्या वस्तुंची न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेत परिक्षण करण्यासाठी पाठवितांना त्या सोबतच्या पत्रात सदर वस्तु या शेतकरी आत्महत्येबाबत जप्त करण्यात आलेल्या आहे असे स्पष्ट नमुद करावे. त्याबाबतचा अहवाल तातडीने मिळवावा व अहवाल ताबडतोब मा.न्यायालय व इतर आवश्यक त्या कार्यालयास संपूर्द करावा.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील कसबा बावडा येथील पोलीस शुटींग रेंज गत १० वर्षापासून बंद असल्याबाबत

**(१०) १०५६३२ (०५-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस आयुक्तालयाच्या शर्यतीमधील प्रमुख दावेदार असणाऱ्या कोल्हापूर पोलीस दलाच्या सरावाकरिता उपलब्ध असणारे शहरातील कसबा बावडा येथील शुटींग रेंज गत १० वर्षापासून बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर पोलीस दलामध्ये १६५ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी, २७८३ पोलीस कर्मचारी असून, शुटींग रेंज बंद असल्याने या सर्वांना सरावासाठी सांगली येथील खंडेराजुरी शुटींग रेंजचा आधार घ्यावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुटींग रेंजअभावी सराव करण्यास अडथळा येत असून, त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या कार्यक्षतेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाहुवाडी तालुक्यातील (जि.कोल्हापूर) १०० एकर प्रस्तावित जागेत अद्ययावत शुटींग रेंज उभा करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे. कसबा बावडा, ता. करवीर, जि. कोल्हापूर येथील गोळीबार मैदान रि.स.नं.८/२ या जागेच्या सभोवताली नागरी वस्ती प्रचंड प्रमाणात वाढल्याने जिवीत अथवा वित्तहानी होऊ नये यासाठी गोळीबार सराव घेतला जात नाही.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) कोल्हापूर जिल्हा पोलीस दलाकरिता सुसज्ज असा फायरिंग बट निर्मितीच्या अनुषंगाने मौजे डोणोली व भाडळे, ता. शाहूवाडी येथील १०० एकर गायरान डोंगराळ जमिनीची पाहणी करण्यात आली असून सदर जमिनीची या प्रयोजनासाठी उपयुक्तता व उपलब्धता तपासण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**मौजे लिंगनूर तर्फे नेसरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे दूध संस्थांच्या सचिवांना अज्ञात चार व्यक्तींनी लाखो रुपयांनी फसविल्याबाबत**

**(११) १०७१६३ (११-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे लिंगनूर तर्फे नेसरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे दूध संस्थाच्या सचिवांना अज्ञात चार व्यक्तींनी डोळ्यात चटणी टाकून लाखो रुपये लुटल्याची घटना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अज्ञात व्यक्तींनी लुटलेली रक्कम हस्तगत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१), (२) व (३) दि.२२/१२/२०१७ रोजी बुगडीकट्टी येथील २ दुधसंस्थांच्या २ सचिवांना लिंगनूर ते मुंगुरवाडी रोडवर चार अज्ञात इसमांनी डोळ्यात चटणी टाकून मारहाण करून रोख रक्कम रू.३,७०,०००/- जबरदस्तीने चोरी करून पळवून नेल्याबाबत दिलेल्या फिर्यादीवरून दि.२२/१२/२०१७ रोजी नेसरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३२/२०१७ भा.दं.वि. कलम ३९४, ३९७, १२० (ब) अन्वये ७ आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, दि.१४/०१/२०१८ रोजी सदर गुन्ह्यास महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी अधिनियम सन १९९९ चे कलम ३ (१) (ii), ३ (२), ३ (४), ३ (५) हे वाढीव कलम लावण्यात आले.

सदर गुन्ह्यात एकुण ७ आरोपींना अटक करण्यात आली असून एका आरोपीकडून रू.१०,०००/- हस्तगत करण्यात आले आहेत. याप्रकरणी दि.२०/०७/२०१८ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सद्यस्थितित सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईतील घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा या मेट्रो-१ साठी भाडेपट्टयावर घेतलेल्या अडीच हेक्टर जमिनीचा मोबदला न दिल्याने, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याबाबत**

**(१२) १०८३१४ (१२-०४-२०१८). श्री.अमर काळे (आर्वी), श्री.तारासिंह सरदार (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर-अंधेरी-वर्सोवा या मेट्रो-१ साठी भाडेपट्टयावर घेतलेल्या अडीच हेक्टर जमिनीचा मोबदला न दिल्याने, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याकरीता, गृहरक्षक दलाने विधी व न्याय विभागाचा सल्ला व मार्गदर्शन मागितल्याची बाब दिनांक १५ डिसेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृहरक्षक दलाची वर्सोव्या जवळील आंबिवली येथील अडीच हेक्टर मोकळी जमीन विविध अटी व शर्तीवर एमएमआरडीए ने घेऊन सदर जमीन मेट्रो-१ च्या रिलायन्स कंपनीला भाडेतत्त्वावर दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेट्रो-१ च्या रिलायन्स कंपनीने एमएमआरडीए बरोबर झालेल्या लेखी करारातील अटी व शर्तीचे पालन न करता, ठरलेले भाडे इतके वर्ष थकीत ठेऊन त्या थकीत भाड्यावरील व्याज व दंड अद्यापी एमएमआरडीएला दिले नसल्याचे उघडकीस येऊनही, एमएमआरडीए ने सदर थकीत रक्कम वसूल करण्याकरीता मेट्रो-१ च्या रिलायन्स कंपनी विरोधात कोणतीच कायदेशीर कारवाई न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, गृहरक्षक दलाने विधी व न्याय विभागाकडे मागितलेला सल्ला व मदतीनुसार विधी व न्याय विभागाने दिलेल्या सल्ल्याचे स्वरूप काय आहे, त्यानुसार गृहरक्षक दलाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) एमएमआरडीऐने दि. १४.८.२०१३ रोजी मेट्रो-१ कंपनीकडून सदर जमीन ताब्यात घेऊन ती नागरी संरक्षण संचालनालयास परत केली आहे. तसेच दि. १४.८.२०१३ पर्यंत सदरच्या जमीनीच्या वापराचे भाडे रु १७,८९,१८,५८१/- व व्याज व सेवा करसह दि.३१.७.२०१७ अखेर एकूण रक्कम रु.३१,८९,७२,४२१/- एवढी असून यापैकी रु. ३,९७,९८,०००/- प्राधिकरणाने मेट्रो वनला देय रक्कमेतून वसूल केली आहे.

मुंबई मेट्रो-१ प्रा.लि. व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये देय रक्कम व तसेच, इतर अनुषंगिक मुद्याबाबत सध्या लवादा समोर सुनावणी सुरु आहे.

(४) व (५) गृहरक्षक दलाने विधी व न्याय विभागाकडे मागितलेला सल्लाबाबतचा संदर्भ त्या विभागाने गृह विभागाकडे पाठविला आहे. या विषयाच्या अनुषंगाने एमएमआरडीऐ चे अधिकारी व महासमादेशक, होमगार्ड यांचे समवेत अपर मुख्य सचिव (गृह) आणि प्रधान सचिव (विशेष) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सदर

भुखंडाच्या भाडयाच्या रक्कमेच्या मोबदल्यात नागरी संचालनालयाच्या क्रॉस मैदानाजवळील जागेवर आवश्यकतेप्रमाणे नागरी संचालनालयासाठी प्रशिक्षण केंद्र व प्रशासकीय इमारत बांधण्याची कार्यवाही एमएमआरडीऐ मुंबई यांचेकडून करण्यात येत आहे.

---

**अकोला, बाभूळगाव आणि बाळापूर (जि.अकोला) येथे नाकाबंदी दरम्यान बाळापूर येथील ठाणेदारांना जीवे मारण्याचा केलेला प्रयत्न**

**(१३) १०९४७० (१४-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, बाभूळगाव आणि बाळापूर (जि.अकोला) येथे गोवंशांना कत्तलीसाठी नेत असतांना पोलीसांनी पकडले असता बाळापूर येथील ठाणेदारांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार किती आरोपींना अटक केली व त्यांच्यावर पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) होय. दि.२७.१२.२०१७ रोजी पोलीस उपनिरिक्षक, पो.स्टे.बाळापूर व त्यांचे सहकारी बाळापूर येथे नाकाबंदी करीत असताना एका संशयीत टाटा सुमो गाडीला थांबविण्याचा प्रयत्न केला असता वरील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अंगावर गाडी घालुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला व कट मारुन पळून गेले.

(२) व (३) सदर गाडीचा पाठलाग करुन त्यांना पकडण्यात आले. सदर गाडीची झडती घेतली असता गाडीमध्ये ५ गोवश किंमत रुपये ५०,०००/- कत्तलीकरिता नेत असल्याचे आढळले. याप्रकरणी पोलीस स्टेशन बाळापूर येथे अप क्र.५२६/१७ क ३०७,३५३,४२९,३४ भादंवि, सहकलम ५(ए), ५(बी), ९ प्राणी संरक्षण कायदा १९७६, कलम ११(ड),(ई)(ल) प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंध कायदा १९६०, कलम १८४ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात तीन आरोपींना अटक करण्यात आली असून एका फरार आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. अटक केलेले सर्व आरोपी सध्या जामीनावर मुक्त आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर शहरात गांधीबाग पोलीस क्वार्टर व गांधीबाग बगिचा तसेच इतर ठिकाणी अनधिकृतरित्या पार्किंग होत असल्याबाबत**

**(१४) १०९६८२ (१२-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात गांधीबाग पोलीस क्वार्टर व गांधीबाग बगिचा या ठिकाणी शहर बस थांबा असतानाही या ठिकाणी अनधिकृतरित्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस चारचाकी वाहनांची पार्किंग होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस वाहतूक शाखेचे अधिकारी यांना गांधीबाग ठोकविक्री बाजार येथील व्यापा-यांकडून पार्किंगकरीता ठराविक रक्कम दिली जात असल्यामुळे या अनधिकृत पार्किंगवर पोलीस वाहतूक शाखा, नागपूर कडून कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मुख्य मार्गावर व डागा स्त्री रुग्णालय येथेही अशाच प्रकारे ऑटोरिक्षांचे अनधिकृत पार्किंग होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व अनधिकृत पार्किंगवर कारवाई करून संबंधीत अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

गांधीबाग हा नागपूर शहरातील बाजारपेठेचा परिसर असल्याने या ठिकाणी लोकांचे मोठ्या संख्येने सतत आवागमन होत असते. तसेच मालवाहू वाहनांचेसुध्दा आवागमन होत असते. नमूद ठिकाणी पार्किंगची व्यवस्था नसल्याने वाहन रस्त्याच्या कडेने लावली जातात.
(२) हे खरे नाही.

सन २०१७ मध्ये सदर ठिकाणी अवैध पार्किंग करणाऱ्या २४६ कसूरदार वाहनांवर तर एप्रिल, २०१८ अखेरपर्यंत १०१ कसूरदार वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यांत आली असून सद्य:स्थितीत कारवाई करणे सातत्याने सुरु आहे.
(३) हे खरे नाही.

नमूद दोन्ही रुग्णालये ही शासकीय रुग्णालये असून तेथे मध्यमवर्गीय तसेच इतर राज्यातील लोक हे उपचाराकरीता येत असतात. हे लोक ऑटोरीक्षाने येत असल्याने ऑटोरिक्षा काही काळ तेथे थांबतात. मात्र ऑटोचालक हे नियमबाह्य पध्दतीने थांबतांना किंवा वाहतूक करतांना मिळून आल्यास त्यांचेवर मोटार वाहन कायद्याअंतर्गत कारवाई करण्यांत येते. सन २०१७ मध्ये १६७ तर माहे एप्रिल, २०१८ पर्यंत ३२ केसेस अशाप्रकारे करण्यांत आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत सातत्याने कारवाई सुरु आहे.
(४) अनधिकृतरित्या पार्क होणाऱ्या वाहनांवर तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यान्वये सतत कार्यवाही करण्यात येत असते. तसेच शहरातील वाहतूक सुरळीत रहावी याकरीता वाहतूक विभाग सतत प्रयत्नशील आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बांधकाम कामगारांची वैद्यकिय प्रतिपुर्ती योजना बंद करण्यात आल्याबाबत**

**(१५) १०९७३८ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बांधकाम कामगारांची वैद्यकिय प्रतिपुर्ती (मेडिक्लेम) योजना बंद करण्यात आली असल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकिय प्रतिपुर्ती योजना पूर्ववत चालू करण्यासह वीट भट्टी कामगारांची नोंदणी सुरु करावी व घर बांधकामासाठी रुपये १० लाख एवढे अनुदान देण्यात यावे या मागणीसाठी बांधकाम कामगारांच्या वतीने राज्यभरात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम कामगारांच्या मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील बांधकाम कामगारांची वैद्यकीय प्रतिपूर्ती (मेडीक्लेम) योजना बंद करून उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २१.०९.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील जिवीत नोंदीत बांधकाम कामगार व त्यांच्यावर अवलंबित कुटूंबियांसाठी महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आली आहे.

(२) हे अशंत:खरे आहे.

फक्त जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे संयुक्त बांधकाम कामगार संघटना, कृती समिती, जिल्हा कोल्हापूर यांनी दिनांक १८.०१.२०१६ रोजी निवेदन सादर केले आहे.

(३) १. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १८.०८.२०१७ रोजीच्या अधिसुचनेव्दारे नव्याने इमारत व इतर बांधकामाच्या व्याख्येत २१ कामांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार विटभट्टी कामगारांची नोंदणी करण्यात येत आहे.

२. प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र नोंदीत बांधकाम कामगारांना केंद्र व राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान रू.२.५० लक्ष तसेच मंडळाकडून रु.२.०० लक्ष अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०३.०२.२०१८ अन्वये सदर योजना लागू करण्यात आली आहे.

३. नोंदीत बांधकाम कामागारांच्या घर खरेदी किंवा घरबांधणीकरीता बँकेकडून घेतलेल्या गृहकर्जावरील रू.६.०० लक्ष पर्यंतच्या व्याजाची रक्कम अथवा रू.२.०० लक्ष मंडळामार्फत देणेबाबतची योजनाही मंजूर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मानूर (ता.शिरूर, जि.बीड) येथे पोलीस चौकी उभारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(१६) १०९८०८ (०५-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस अधीक्षक, बीड यांनी मानूर (ता.शिरूर, जि.बीड) येथे पोलीस चौकी निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय
(३) असल्यास, सदरहू निर्णयाचे स्वरूप काय आहे व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) प्रस्तावित मानुर पोलीस चौकीच्या कार्यक्षेत्रातील गुन्ह्यांची सरासरी २५ टक्क्यापेक्षा कमी असल्याने सदर ठिकाणी पोलीस चौकी देय नाही.
(३) प्रस्तावित मानुर पोलीस चौकीच्या कार्यक्षेत्रातील गुन्ह्यावर प्रतिबंध करण्यासाठी पोलीस ठाणे यांच्याकडून एक पोलीस अधिकारी/एक पोलीस हवालदार व एक पोलीस शिपाई यांची नेमणुक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बोरिवली, मुंबई येथील नॅशनल पार्क, कुलुपवाडी हायवेवरील वाहतुकीची कोंडी सोडविण्याबाबत**

**(१७) ११२४२६ (०१-०४-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली, मुंबई येथील नॅशनल पार्क, कुलुपवाडी हायवेवरील वाहतुकीची कोंडी सोडविण्याकरिता ट्राफिक सिग्नल बसविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास पोलिस सह आयुक्त (वाहतूक), वरळी, मुंबई यांच्याकडे लेखी तक्रार केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्राप्त तक्रारीस अनुसरुन कुलुपवाडी, बोरीवली पूर्व या ठिकाणी सिग्नल बसविणेबाबतचा प्रस्ताव वाहतूक शाखेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर करण्यांत आला होता. त्यानुसार सदर ठिकाणी सिग्नल उभारणीची वाहतूकीच्या दृष्टीकोनातून व्यवहार्यता तपासून महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागाराकडून नमूद ठिकाणी सिग्नल उभारणीची शिफारस महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे. सदर सिग्नल उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या पश्चिम द्रुतगती मार्गावर केबलसाठी डक्ट उपलब्ध करुन देण्याकरीता महानगरपालिकेने सार्वजनिक बांधकाम विभागास विनंती केलेली

आहे. सदर ठिकाणी डक्टस टाकून / उपलब्ध करुन दिल्यानंतर सिग्नल उभारण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून प्राधान्याने करण्यांत येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर आणि जिल्ह्यात अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१८) ११३६८३ (१४-०४-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर आणि जिल्ह्यात तीन वर्षांत एकूण ११ हजार ७९० अपघातांची नोंद झाली असून, त्यात चार हजार ४१२ नागरिकांचे बळी गेले, तर ९ हजार ५८२ नागरिक जखमी झाले असल्याची बाब दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे ही खरे खरी आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) पुणे शहर व जिल्ह्याची गत तीन वर्षांची अपघाताची सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| सन | एकूण अपघात | मयत संख्या | जखमी संख्या |
|---|---|---|---|
| २०१५ | ३,९८९ | १,५४३ | ३,३४८ |
| २०१६ | ३,६५९ | १,४७१ | २,९५३ |
| २०१७ | ३,७९३ | १,३९३ | ३,१७८ |
| एकूण | ११,४४१ | ४,४०७ | ९,४७९ |

(२) अपघात कमी होण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-
पुणे शहर :

पुणे शहरात अपघात कमी होण्याकरीता वाहतूक शाखेकडून ३६ अपघातप्रवण क्षेत्र निश्चित करण्यांत आले आहेत. सदर ठिकाणी सुधारणा होण्याकरीता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जिल्हाधिकारी, पुणे यांना वाहतूक शाखा, पुणे शहर यांचेमार्फत योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.
पुणे ग्रामीण :

पुणे ग्रामीण जिल्ह्यातील अपघात कमी होण्याकरीता जिल्हा वाहतूक शाखेकडून तसेच सर्व पोलीस ठाणे यांचेकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येते. रस्ता सुरक्षा सप्ताहाअंतर्गत वाहन चालक/मालक यांचे वाहतूक प्रबोधन करण्यात येत असून शालेय विद्यार्थ्यांना वाहतुकीचे मार्गदर्शन करण्यात येत आहे. महामार्गावर ठिकठिकाणी वाहतुकीचे प्रबोधन करणारे बॅनर्स लावण्यात आले असून हँडबिलचे वाटप करण्यात आले आहे. अपघातप्रवण क्षेत्रात मार्गदर्शक फलक लावण्यात आलेले आहेत. वाहन चालक/ मालक यांचेसाठी वैद्यकीय शिबिरे आयोजीत करण्यात येतात.

महामार्ग पोलीस :

महामार्ग पोलीस विभागाअंतर्गत पुणे जिल्ह्यात पाच महामार्ग पोलीस मदत केंद्र कार्यरत असून सदर केंद्रांमार्फत महामार्गांवरील अपघाताचे प्रमाण कमी होण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते. तसेच वाहतुकीचे नियमन करण्यांत येऊन अपघातग्रस्तांना महामार्ग पोलीसांकडून तात्काळ मदत करण्यांत येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कौशल्य विकास योजनांतर्गत एम.एस.एस.डी.एस मार्फत ३ वर्षात अनेक प्रशिक्षण संस्थांना मंजुरी देऊनही अद्याप प्रशिक्षण सुरु करण्याचे आदेश दिले नसल्याबाबत**

**(१९) ११४८९८ (१८-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी,मुंबई (MSSDS) यांच्या मार्फत गत ३ वर्षात अनेक प्रशिक्षण संस्थांना (VTP) मान्यता देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षण संस्था (VTP) म्हणून मान्यता प्राप्त करण्यासाठी सुशिक्षित तरुण/तरुणींना जागा भाड्याने घेऊन कौशल्य विकास सोसायटीच्या नियमानुसार आवश्यक सामग्री खरेदी करून प्रशिक्षण संस्था स्थापन केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रशिक्षण संस्थांची तपासणी करून त्यांना मान्यता देऊनही राज्यातील अनेक प्रशिक्षण संस्थांना प्रशिक्षण वर्ग सुरु करण्याचे आदेश अद्यापपर्यंत देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लाखो रुपये खर्च करून तयार केलेल्या प्रशिक्षण संस्थांना प्रशिक्षण वर्ग चालू करण्याचे आदेश न देण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, मान्यता दिलेल्या सर्व संस्थांना प्रशिक्षण वर्ग चालू करण्याच्या सूचना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०९-२०१८) : (१)**. हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद (National Skill Development Corporation-NSDC) यांनी सन २०१२ मध्ये केलेल्या महाराष्ट्र राज्याच्या "स्किल गॅप स्टडी" नुसार जिल्हानिहाय, क्षेत्रनिहाय (Sector wise) कुशल मनुष्यबळाची आवश्यकता, सुचिबद्ध प्रशिक्षण संस्थांची क्षमता आणि वित्तीय वर्षाकरिता उपलब्ध निधी या बाबींचा विचार करुन एप्रिल-२०१८ अखेरपर्यंत ३३४३ सुचिबद्ध व्यवसाय प्रशिक्षण संस्थांमार्फत एकूण ४,३६,६३३ उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले/येत आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरात मागील सहा वर्षात साडेतीन हजारांहून अधिक रस्ते अपघात झाल्याबाबत**

**(२०) ११५१५४ (११-०४-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात मागील सहा वर्षात साडेतीन हजारांहून अधिक रस्ते अपघात झाले असून एक हजार जीवघेण्या अपघातांमध्ये सुमारे एक हजार ९७ व्यक्तिंचा जीव गेला आणि दोन हजार ७१४ व्यक्ती गंभीर जखमी झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) नाशिक शहराची गत सन २०१२ ते २०१७ या सहा वर्षांची अपघाताची सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| सन | एकूण अपघात | जिवघेणे अपघात | मयत संख्या | गंभीर जखमी |
|---|---|---|---|---|
| २०१२ | ५४० | १४५ | १५५ | २३५ |
| २०१३ | ५७७ | १०१ | १०८ | ३२८ |
| २०१४ | ६२० | १६५ | १७२ | ३०२ |
| २०१५ | ७१५ | २२५ | २३४ | ४१९ |
| २०१६ | ६२८ | २०३ | २१३ | ३५१ |
| २०१७ | ५०३ | १५८ | १७१ | ३९० |
| एकूण | ३,०४३ | ८५२ | ८९८ | १,७९० |

(२) वाहतूक नियमांची अंमलबजावणी व अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी विशेष प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यांत येत आहे :-

१. नाशिक शहरात ३८ सिग्नल कार्यान्वीत असून आणखी १५ सिग्नल्स उभारण्यासाठी कार्यवाही सुरु आहे

२. मार्गावरील वृक्षांना परावर्तक लावण्यांत आले आहेत.

३. शहरातील १७ महत्वाच्या रहदारी चौकांची निवड करुन "चौक दत्तक योजने" अंतर्गत चौकांचे सुशोभिकरण आणि वाहतूक सुरळीत होण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

४. जास्त रहदारीचे मार्गावर ब्लिंकर मोडवर स्वयंचलीत यंत्रणा बसविण्याचे काम सुरु आहे.

५. अपघातप्रवण क्षेत्र असलेल्या ठिकाणी विशेषत: शाळा, महाविद्‌यालये, रुग्णालये इ. ठिकाणी गतिरोधक टाकणेसंदर्भात समिती गठीत करुन मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे गतिरोधक टाकण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

६. शाळा, महाविद्यालये, औद्योगिक क्षेत्रामध्ये वाहतूक नियमांबाबत प्रबोधन करण्यात येत आहे.

७. पाच किंवा त्यापेक्षा जास्त गंभीर अपघातस्थळांची माहिती काढून त्याबाबत बांधकाम विभाग, महानगरपालिका बांधकाम विभाग, राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण इ. यंत्रणांसमवेत बैठका आयोजीत करुन संयुक्तरित्या ब्लॅक स्पॉटची पाहणी करुन त्या ठिकाणी अपघात कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सूचवून त्यावर संबंधित विभागांकडून कारवाई सुरु आहे.

८. "छोटा पोलीस" या योजनेच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांचा वाहतूक विषयक जनजागृतीसाठी समावेश केला जातो.

९. नाशिक शहरातील स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरीक, महाविद्यालयीन विद्यार्थी यांमधून २५० हून अधिक स्वयंसेवकांना ट्रॅफिक अँबेसिडर म्हणून नेमणूक देण्यांत आली असून त्यांचेकडून शहरातील मुख्य चौक, सिग्नल, गर्दीचे ठिकाणी वाहतूक नियमांचे प्रबोधन करण्यात येते.

१०. सन २०१७ मध्ये वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनाधारकांवर मोटार वाहन कायद्यानवये १,८३,५०२ केसेस करण्यांत आल्या असून रु.४.४५ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला आहे तर माहे मार्च, २०१८ पर्यंत एकूण ५६,२१५ इतक्या केसेस मध्ये एकूण रु. १.३२ कोटी इतकी दंड वसूली करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील संचालक, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२१) ११५४७४ (११-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील संचालक (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विभाग) न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या असल्याने प्रत्येक महिन्याला सरासरी ४ ते ५ इतकीच प्रकरणे निकालात काढण्यास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे याबाबत गुन्ह्याच्या तपासात विश्लेषणाद्वारे पुरावे सादर करण्यात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयात हजारो प्रकरणे दररोज दाखल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, न्याय सहायक वैधानिक प्रयोगशाळा संचालनालयातील कर्मचारी व अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१), (२) व (३) खरे नाही.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाअंतर्गत संगणक गुन्हे विभागात माहे जानेवारी २०१८ ते एप्रिल २०१८ या कालावधीत प्रयोगशाळा निहाय व सरासरी प्रतिमाह मुंबई-१५२, नागपूर-१७, पुणे-२७ आणि ध्वनीफित विश्लेषण विभागात प्रतिमाह प्रयोगशाळा निहाय मुंबई-३२, नागपूर-०६ ,पुणे-१८, औरंगाबाद-२४, नाशिक-१२ व अमरावती-०९ अशी प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.

राज्यात संचालनालयाअंतर्गत कार्यरत विविध प्रयोगशाळांमध्ये संगणक गुन्हे विभागात २४४२ आणि ध्वनीफित विश्लेषण विभागात १२६२ अशी एकूण ३७०४ दाखल झालेली प्रकरणे दररोज दाखल झालेली नसून सन २०१७ च्या वर्षभराच्या कालावधीमधील आहेत.

(४) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील संगणक गुन्हे व ध्वनीफित विश्लेषण विभागातील सहायक संचालकाची ६ रिक्त पदे, वैज्ञानिक अधिकारी ४३ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. तसेच वैज्ञानिक सहायकाची ७३ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन परीक्षा घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

त्याचप्रमाणे सदर विभागातील प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्याकरिता कृती आराखडा तयार करुन ८३० कंत्राटी पध्दतीवर अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वरळी बीडीडी चाळीत गत ३० वर्षे राहणा-या पोलीस कुटुंबाना पुनर्विकासानंतर मालकी हक्काने घरे देण्याच्या निर्णयाबाबत

**(२२) ११६०६६ (१४-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी बी.डी.डी. चाळीतील गत २० वर्षापासून जे पोलीस कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी राहत आहेत त्यांच्या नावे हस्तातंरीत करण्याबाबत त्यांच्या संघटनेने मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, गृहनिर्माण व प्रधान सचिव, गृह विभाग तसेच पोलीस आयुक्त मुंबई यांच्याकडे मागील ५ वर्षापासून मागणी करीत असून तसेच याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत लेखी निवेदनही दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांच्या नावे निवासस्थान देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व तद्नुसार अद्यापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकासासाठी पात्रतेच्या संदर्भात व इतर विषयाबाबत मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९/०१/२०१८ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत “बी.डी.डी. चाळीच्या जमिनीवर गृह विभागाच्या ताब्यात असलेल्या व पोलीस निवासस्थाने म्हणून वितरीत करण्यात आलेल्या सुमारे २९०० गाळ्यांबाबत” या मुद्याबाबत “बी.डी.डी. चाळ पुनर्विकास प्रकल्पात म्हाडाने आवश्यक संक्रमण गाळे गृह विभागास हस्तांतरीत करावे व गृह विभागाने बी.डी.डी. चाळीतील गाळे रिक्त करुन म्हाडाच्या ताब्यात पुनर्विकासासाठी द्यावेत. पुनर्विकास पुर्ण झाल्यानंतर म्हाडाने पुनर्वसित गाळे (पोलीसांच्या सेवासदनिका इतके) गृह विभागास हस्तांतरीत करावे व गृह विभागातर्फे पुनर्वसन गाळ्यांचे वितरण करण्यात यावे. पुनर्वसन गाळे वितरीत करणे प्रकरणी गृह विभागाने नियमावली/ पात्रतेचे निकष निश्चित करावेत” असा निर्णय घेण्यात आला आहे.

---

### न्हावाशेवा (जि.रायगड) येथील भारत मुंबई कंटेनर टर्मिनल प्रकल्पग्रस्तांवर होत असलेला अन्याय

**(२३) ११६६३० (३०-०७-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावाशेवा (जि.रायगड) येथील जेएनपीटी, सिंगापूर पोर्टसाठी चौथे बंदर म्हणून ओळखल्या जाणा-या भारत मुंबई कंटेनर टर्मिनलसाठी (बीएमसीटी) ज्या शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या ते शेतकरी भूमिहीन झाल्याने व त्यांचा शेती आणि मासेमारी हे उत्पन्नाचे साधन नष्ट झाल्यामुळे उदरनिर्वाहासाठी त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिला प्रकल्पात रोजगार देण्याचा निर्णय जेएनपीटी, सिंगापूर पोर्ट, बीएमसीटी कंपनी व्यवस्थापन व प्रकल्पग्रस्त यांच्यात झालेला असतांनाही त्यांना डावलण्यात येऊन माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सुमारे २० परप्रांतीयांची भरती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षभरापुर्वीही याच बंदरात १६५ परप्रांतीयांची भरती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे प्रकल्पग्रस्तांची फसवणूक करण्यात आल्याने स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ नये व त्यांना नोक-या मिळाव्यात याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

जवाहरलाल नेहरु बंदर विश्वस्त हे मोठे बंदर असून ते केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ शिपिंग यांच्या अखत्यारीत येते. जेएनपीटीने दिलेल्या माहितीनुसार मागील वर्षभरात

बीएमसीटीपीएल कंपनीने नियुक्त केलेल्या एकूण १६५ उमेदवारांपैकी ८० टक्के उमेदवार हे प्रकल्पग्रस्त/स्थानिक आहेत. उर्वरित इतर प्रामुख्याने कार्यकारी व व्यवस्थापन संवर्गातील आहेत.

(३) होय.

(४) जेएनपीटीने गरजू प्रकल्पग्रस्त व्यक्तींना न्याय देण्यासाठी तसेच प्रकल्पग्रस्तांच्या भरती प्रक्रिया अधिक पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी नोकर भरतीचे तीन प्रकारच्या याद्यांमध्ये वर्गीकरण केले असून त्याप्रमाणे प्राधान्याने प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याची तरतुद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत २०० हून अधिक बनावट उमेदवाराच्या माध्यमातून पास होऊन शासकीय सेवेत दाखल झाल्याबाबत**

**(२४) ११७१२० (३०-०७-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत, यंदा २०० हून अधिक बनावट उमेदवारांच्या माध्यमातून पास होऊन, शासकीय सेवेत दाखल झाल्याची बाब माहे मार्च २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत बनावट विद्यार्थी बसविण्याची मोठी साखळी असून, सन २०१५-१६ पासून ते अद्यापपर्यंत बनावट उमेदवार बसवून एक हजारहून अधिक मुले शासकीय सेवेत भरती झाल्यामुळे, हुशार मुलांवर अन्याय झाल्याची व होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची राज्य शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार एमपीएससी परीक्षेत बनावट विद्यार्थी बसविणारी साखळी उद्ध्वस्त करण्याच्या दृष्टीने, शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१८) :** (१) व (२) सदर प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांचे मार्फत करण्यात येत असून आजपावेतो करण्यात आलेल्या तपासात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने आयोजित केलेल्या तीन स्पर्धा परीक्षेत एकूण तीन डमी उमेदवार बसविल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे. तसेच, लोकसेवा आयोगाच्या परीक्षेव्यतिरीक्त शासनाच्या विविध आस्थापना मधील सन २००७ ते २०१५ या कालावधीत घेण्यात आलेल्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या स्पर्धा परीक्षांमध्ये डमी उमेदवार बसवुन गैरमार्गाचा अवलंब करुन शासकीय सेवेत प्रवेश मिळविला असल्याबाबत एकूण ७० ते ७५ प्रकरणे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहेत.

(३) होय.

उक्त प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन, मांडवी जि. नांदेड येथे गु.र.नं. २७/२०१६ भा.दं.वि. १६७, १७१, १९३, १९७, १९८, २०१, २०३, २१३, २१४, २१८, २२१, ४२०,४१९, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्यात डमी उमेदवार, शासकीय सेवेत दाखल झालेले मुळ उमेदवार व शासकीय अधिकारी कर्मचारी असे एकूण ३५ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. त्यापैकी आजपावेतो २४ आरोपींविरुध्द १ मूळ व ४ पुरवणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहेत. सदर गुन्ह्याचा अधिक तापास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ (८) अन्वये सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**नागपूर शहरातील आसी प्लास्टो व्यवस्थापनाकडुन कामगारांची पिळवणूक होत असल्याबाबत**

**(२५) ११७१९९ (२६-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील आसी प्लास्टो व्यवस्थापनाकडुन कामगारांना किमान वेतन, मध्यांत विश्रांती सुट्टी न देता पिळवणूक करत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्मचाऱ्यांनी पूर्व नागपूरातील पाण्याच्या टाकीवर चढुन आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यवस्थापनाकडून कर्मचाऱ्यांना धमकाविले जात असून कामगार विभागाचे अधिकारी व्यवस्थापनाशी संगनमत करुन कामगारांना किमान वेतन देण्यापासून व इतर सुविधांपासून वंचित ठेवीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच कामगारांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (११-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही,

याबाबत कोणतीही तक्रार कामगार आयुक्त कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) खरे आहे.

दि.१८/०५/२०१८ रोजी कंपनीतील काही कामगार वर्धमान नगर, नागपूर येथील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करीत होते. परंतु, या आंदोलनाबाबत कंपनी किंवा कामगार कार्यालयास कामगारांनी/कामगार संघटनेने निवेदन किंवा सूचना दिलेली नाही. तथापी, दिनांक १८/०५/२०१८ रोजी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलेल्या ३९ कामगारांवर पोलीसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

(३) हे खरे नाही.

दि.०१.०४.२०१५ च्या वेतन करारानुसार कामगारांना किमान रु.९५००/- व कमाल रु.११,५००/- वेतन मिळत आहे. याशिवाय कंत्राटी कामगारांना "प्लास्टीक" या किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील अनुसूचित उद्योगाचे निर्धारित किमान वेतन दराने वेतन मिळत आहे.

(४) महाराष्ट्र जनरल कामगार युनियनने दिनांक १७/०८/२०१७ रोजी कामगारांचे वेतनात रु.६००/- प्रतिमाह वाढ करावी, असे प्रकरण कामगार आयुक्त कार्यालयात दाखल केले आहे. सदर प्रकरणात औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम २-के अंतर्गत समेट कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण (जि.रत्नागिरी) शहर व परिसरात आयपीएल क्रिकेट सामन्यांवर चालणाऱ्या बेटींग व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२६) ११७३१९ (३०-०७-२०१८). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील मापारी मोहल्ला येथे आयपीएल क्रिकेट सामन्यांवर चालणाऱ्या अवैध बेटींग व्यवसायावर धाड टाकून स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने दोन जणांवर कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिपळूण शहर व परिसरात अशाप्रकारे अनेक ठिकाणी अनेक वर्षांपासून अवैध बेटींग सुरू असून त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी अवैध बेटींग व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई न होण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, अवैध बेटींग व्यवसाय रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी २ आरोपींविरूद्ध चिपळूण पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९७/२०१८ महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४,५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा तपासावर आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

अवैध बेटींग व्यवसाय रोखण्यासाठी गुप्त माहीतगारांकडून माहीती काढून त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माझगाव (मुंबई) मधील सेंट पीटर्स हायस्कूल येथील एका ४ वर्षीय अल्पवीयन मुलीवर शाळेतील महिला शिपायानेच अत्याचार केल्याची घटना**

**(२७) ११७५६१ (३०-०७-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माझगाव (मुंबई) येथील सेंट पीटर्स हायस्कूल माझगाव येथील एका ४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर शाळेतील महिला शिपायानेच अत्याचार केल्याची गंभीर बाब दिनांक २४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघड झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषी महिला शिपायास पोलीसांनी अटक करुन तिच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २३/०४/२०१८ रोजी भायखळा पोलीस ठाणे वि.स्था. गुन्हा रजि. क्र. ५९/ १८ कलम ४, ६, १० पॉक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यानुसार आरोपी महिलेस त्याच दिवशी अटक करण्यात आली. सद्यस्थितीत गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपीविरूध्द मा. सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा प्रशासनाने नाशिक शहरातील सेतू कार्यालय बंद केल्याबाबत**

**(२८) ११८२८० (३०-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा प्रशासनाने नाशिक शहरातील सेतू कार्यालय माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सेतू कार्यालय बंद केल्यामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना विविध दाखले मिळण्यास अडचण निर्माण झाली असून त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सेतू कार्यालय बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदर सेतू कार्यालय सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नाशिक शहर सेतू केंद्र व नाशिक तहसिल ग्रामीण सेतू केंद्राबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याने व निविदा व कार्यारंभ आदेशातील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन न केल्याने तसेच सेतू चालकांचे सेतूच्या कामकाजावर कोणतेही नियंत्रण नसल्याचे आढळून आल्याने सदरचे सेतू केंद्र बंद करण्यात आले आहेत.

(४) सेतू बंद करण्याच्या निर्णयाविरुध्द गुजरात इन्फोटेक लि. अहमदाबाद या सेतू संस्थेने मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र. ३५६५/२०१८ दाखल केली होती ज्याचा निकाल दिनांक ०९.०४.२०१८ रोजी झालेला असून उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वाटाघाटी सबंधित सेतू संस्थेसोबत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ससाणी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) येथे बोगस बीटी बियाणे आढळल्याबाबत**

**(२९) ११९५७६ (३०-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससाणी (ता.घाटंजी, जि.यवतमाळ) गावातील एका व्यक्तीच्या घरात आर.आर.सिकंदर, आर.आर.प्रान्सी, सुपर गार्ड हायब्रीड कॉटन सिड्स या कंपनीच्या बोगस बीटी बियाणांच्या एकूण १४ बॅग माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सापडल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसांनी संबंधित कंपनीच्या मालकास अटक केली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १५ मे २०१८ रोजी मौजा ससाणी ता.घाटंजी, जि.यवतमाळ येथे एका व्यक्तीच्या घरात बोगस बिटी बियाण्यांचे आर.आर. सिकंदर, आर. आर. प्रान्सी, सुपर गार्ड हायब्रीड कॉटन सिड्स चे १४ पोते व त्यात प्रत्येकी ४५० ग्रॅम च्या एकूण ७०० बॅग्स सापडल्या आहेत. सदर व्यक्तीस दिनांक १६/५/२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी पो.स्टे.घांटजी येथे गु. र. क्र.१९८/१८, कलम ४२०, ४६३, ४६५, ४६८, ४७१, ३४ भादंवि सह कलम ६, ८, ९, १०, ११, १२, १३, १४ कापूस बियाणे अधिनियम सह कलम १० विनापरवाना कापुस बियाणे साठवणुक व विक्री अधिनियम सह कलम ७ जिवनावश्यक वस्तु अधिनियम सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धाटाव औद्योगिक क्षेत्रातील (ता.रोहा, जि.रायगड) मे.दानशमंद ऑरगॅनिक प्रा.लि.या कंपनी व्यवस्थापनाने १९ कामगारांना नोकरीवरून काढल्याबाबत**

**(३०) १२००४६ (२६-०७-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) औद्योगिक क्षेत्रातील मे.दानशमंद ऑरगॅनिक प्रा.लि.या कंपनी व्यवस्थापनाने १९ कामगारांना माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्या दरम्यान कोणतीही लेखी नोटीस न देता नोकरीवरून काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीत एकूण ३३ कायमस्वरूपी कामगार व बाकी कंत्राटी कामगार काम करत असून कंपनी व्यवस्थापनाने १९ कायमस्वरूपी कामगारांना तडकाफडकी काढून टाकाल्याने त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन मे.दानशमंद ऑरगॅनिक प्रा.लि.यासारख्या कंपन्यांच्या आडमुठ्या धोरणांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, संबंधित १९ कामगारांना पूर्ववत कंपनी आस्थापनेत सामिल करून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (११-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) धाटाव औद्योगिक क्षेत्रातील (ता.रोहा, जि.रायगड) मे.दानशमंद ऑरगॅनिक प्रा.लि. या कंपनीने दिनांक २५/०४/२०१८ रोजी औद्योगिक विवाद अधिनियम,१९४७ च्या कलम २५ (एफ) (ए) नुसार १९ कामगारांची कपात केली होती.

या संदर्भात कामगार उप आयुक्त कार्यालयात दिनांक १५/०५/२०१८ व दिनांक २२/०५/२०१८ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने व्यवस्थापन व कामगार संघटना यांच्यामध्ये दिनांक २५/०५/२०१८ रोजी करार होऊन, सदर कपात केलेल्या १९ कामगारांना कामावर घेण्यात आले आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपळवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील शाळेतील विद्यार्थ्याला शिक्षकाने केलेली अमानुष मारहाण**

**(३१) १२०७८२ (३०-०७-२०१८). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळवाडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथिल कु.रोहीत दत्तात्रय जंजिरे या ८ वर्षाच्या विद्यार्थ्याला शिक्षकांनी गणित चुकल्याने तोंडात लाकडी छडी कोंबल्याची घटना दिनांक १३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुलाच्या आईने पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१), (२) व (३) फिर्यादी यांच्या इयत्ता २ री मध्ये शिकणाऱ्या ८ वर्षाच्या मुलाच्या तोंडात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळवाडी (ता.कर्जत,जि.अहमदनगर) येथिल वर्गशिक्षकाने गणित चुकल्याने तोंडात लाकडी छडी कोंबल्याच्या तसेच सदर प्रकार घरी सांगितला तर आणखी मारीन असा दम दिल्याच्या फिर्यादीवरून कर्जत पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१०१/२०१८ भा.दं.वि.कलम ३२६, ३२४, ५०६, प्रमाणे दि.११/०४/२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

आरोपी शिक्षकास मा.न्यायालयाने अटकपूर्व जामिन मंजूर केल्याने सदर आरोपीस नॉमिनल अटक करून त्यास मा.न्यायालयाचे आदेशास अधिन राहून जामिनावर मुक्त केले आहे. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. आरोपी विरूध्द दाखल गुन्हयाबाबत पंचायत समिती कर्जत यांना कळविण्यात आले असून शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी दि.१३.०४.२०१८ रोजी आरोपीवर निलंबनाची कारवाई केलेली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### देवखेड (ता.सिंदखेडराजा, जि.कोल्हापूर) येथील अवैध दारू विक्री बंद करण्याबाबत

**(३२) १२१०६४ (२५-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवखेड (ता.सिंदखेडराजा, जि.कोल्हापूर) येथील अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी, अशी मागणी किनगावराजा पोलीस स्थानकांत माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार पोलीस प्रशासनाने अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :**१) होय, हे खरे आहे तथापि दिनांक १६/०४/२०१८ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी एप्रिल २०१८ मध्ये दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एका आरोपीविरुध्द अप. क्र.८६/१८ कलम

६५ (ई) म.दा.का. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे. दुसऱ्या आरोपीविरुध्द अप.क्र.८७/१८ व अप.क्र.१५४/१८ कलम ६५ (ई) म.दा.का अन्वये गुन्हा दाखल असून गुन्हा तपासावर आहे. सदर आरोपी विरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगावराजा (जि.बुलढाणा) उपविभागामध्ये अवैध दारुची वाहतूक होत असल्याबाबत**

**(३३) १२१०७० (२५-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा (जि.बुलढाणा) उपविभागामध्ये अंढेरा हद्दीत अवैध दारू व एक दुचाकी उपविभागीय पोलीस अधिकारी (एसडीपीओ) च्या पथकाच्या कारवाईत दिनांक २ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास जप्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी किती जणांना अटक करण्यात आली आहे व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१८) :** (१) बुलढाणा जिल्हयातील उपविभाग देऊळगांवराजा अंतर्गत पो.स्टे. अंढेरा खुर्द फाटा येथे दिनांक १४/०५/२०१८ रोजी गुप्त माहितीच्या आधारे ४ आरोपींना पोलीसांनी ताब्यात घेवून त्यांच्याकडून १६,८०० रुपयाचा मुद्देमाल व एक इंडीका कार जप्त केली आहे.
(२) व (३) चार आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द गु.र.क्र. १३७/१८, मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५, ८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पट्टणकोडोली येथील तलाठी आणि गावचावडीतील अनधिकृत उमेदवार यांनी खत खरेदी करण्यासाठी बनावट सातबारा उतारा तयार केल्याबाबत**

**(३४) १२१२१९ (२५-०७-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पट्टणकोडोली येथील तलाठी श्री.घाटगे आणि गावचावडीतील अनधिकृत उमेदवार श्री.विजयानंद मोरे यांनी खत खरेदी करण्यासाठी खोटा सात-बारा उतारा तयार करून शेतकरी असल्याचा दाखला दिल्या प्रकरणी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पट्टणकोडोली येथील तलाठी आणि गावचावडीतील अनधिकृत उमेदवार यांनी खत खरेदी करण्यासाठी खोटा सात-बारा उतारा तयार करून शेतकरी असल्याचा दाखला दिल्या प्रकरणी गुन्हा अगर तक्रार दाखल नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

**जामखेड (जि.अहमदनगर) येथे एकाच कुटुंबांतील दोघा बंधूची झालेली हत्या**

**(३५) १२१३४७ (३०-०७-२०१८). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामखेड (जि.अहमदनगर) येथे एकाच कुटुंबांतील दोघा बंधूंची पिस्तूलने गोळ्या झाडून हत्या केल्याने तेथील महिलांनी न्याय मिळण्याबाबत जामखेड पोलीस स्टेशनवर दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ७५/२०१८ भा.दं.वि. कलम ३०२, १२० (ब), १४३, १४७, १४८, १४९ सह आर्म ॲक्ट ३/२५, २७ अन्वये दि.२९/०४/२०१८ रोजी एकुण १४ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्यात ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे व १ विधी संघर्ष बालकास मा.प्रधान न्यायदंडाधिकारी, बाल न्याय मंडळ, अहमदनगर यांचे समक्ष हजर केले आहे. उर्वरीत फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर ) येथील श्रीराम मंदिरातील मूर्ती चोरीस गेल्याबाबत**

**(३६) १२१३७७ (२६-०७-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) येथील श्रीराम मंदिरातील मूर्ती चोरीचा तपास अद्यापही पूर्ण झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तपास करण्याबाबत व आरोपींना अटक करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि.२४/०१/२०१८ रोजी मंदिराच्या गाभाऱ्यातील पंचधातुची श्रीकृष्णाची मुर्ती, पद्मावती देवी, लक्ष्मी देवीची मुर्ती, तसेच इतर देवाच्या ६ मुर्ती अशा एकुण ५२,७५०/- रुपये किंमतीच्या मुर्ती अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याबाबत प्राप्त फिर्यादीवरुन रेणापूर पोलीस स्टेशन येथे दि.२४/०१/२०१८ रोजी गु.र.नं. २७/२०१८ भा.दं.वि. कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात घटनास्थळाचा पंचनामा करुन १९ साक्षीदार तपासण्यात आले आहेत. श्वानपथक, अंगुलीमुद्रा तज्ञ यांच्या मदतीने तपास करण्यात आला आहे. तसेच, संशयीतांच्या घरझडत्या घेण्यात आल्या आहेत. तसेच भांड्याचे दुकानदार, सोनार व भंगार विक्रिते यांच्याकडे तपास करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासासाठी खास पथक नेमण्यात आले असून गोपनीय बातमीदार नेमण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील सर्व शासकीय विभागात अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(३७) १२१४१० (२५-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय विभागात अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आंदोलनात आरोग्य विभागासह सर्वच राज्य शासनाचे शासकीय विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा तसेच शासनाच्या सर्व योजनांमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, उक्त मागण्यांच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१०-२०१८) :** (१) व (२) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अहवालानुसार मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या शासकीय निवासस्थानी दि. २३.०४.२०१८ वा त्यासुमारास राज्यातील शासकीय विभागात सेवारत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कोणत्याही प्रकारचे आंदोलन केलेले नाही.

तथापि, महाराष्ट्र कंत्राटी कर्मचारी महासंघ, यांनी दि. २३.०४.२०१८ रोजी राज्यातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकरीता आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन केले होते,

(३) व (४) या धरणे आंदोलनादरम्यान आंदोलकांनी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि. ०९.०२.२०१८ रद्द करणे, समान कामासाठी समान वेतन, रिक्त पदांवर कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समायोजन इ. मागण्या केल्या होत्या.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार करार/ कंत्राटी तत्वावर निर्माण केलेल्या पदांवर नेमणूकांबाबतच्या अटी व शर्ती आणि अशा पदांवर नियुक्त कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित न करण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि.०९.०२.२०१८ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. उक्त शासन परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांचे पुनर्विलोकन होईपर्यंत सदर परिपत्रकातील सूचनांना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि. ०७.०३.२०१८ अन्वये स्थगिती देण्यात आली आहे.

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कंत्राटी निदेशकांना तसेच अन्य प्रशासकीय विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी पदधारकांना नियमित शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत अभ्यास करुन अहवाल सादर करण्याकरीता शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, दि. ०८.०५.२०१८ अन्वये मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे,

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आठ माहिती आयुक्तांकडे सुमारे ३६ हजार ८८६ अपिलांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(३८) १२१६१६ (२५-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आठ माहिती आयुक्तांकडे सुमारे ३६ हजार ८८६ अपिलांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहिती अधिकार कायद्यानुसार एखादी माहिती देण्यास माहिती अधिका-याने असमर्थता दर्शविली , चुकीची माहिती दिली अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केली तर

माहिती आयुक्तांकडे दाद मागता येते यासाठी राज्यात आठ ठिकाणी माहिती आयुक्त कार्यालये आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहिती आयुक्तांकडील प्रलंबित अपिलांची संख्या गत तीन वर्षात वाढली असुन जर प्रलंबित प्रकरणे निकाली काढली नाहीत तर माहिती अधिकाराचा हेतू साध्य होणार नाही तरी या प्रकरणी शासनाने आवश्यक कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :**(१) होय. तथापि, राज्य माहिती आयोग, मुख्यालय व अन्य खंडपीठाकडे मे, २०१८ अखेर प्रत्यक्षात एकूण ३५,७५९ द्वितीय अपीले प्रलंबित आहेत.
(२) होय, राज्य शासनाने राज्य माहिती आयोगाचे मुख्यालय मुंबई येथे स्थापन केले आहे. औरंगाबाद नागपूर, पुणे, नाशिक, नवी मुंबई व अमरावती येथे माहिती आयोगाची विभागनिहाय कार्यालये स्थापन करण्यात आली असून बृहन्मुंबई करिता आयोगाचे स्वतंत्र कार्यालय स्थापन करण्यात आले आहे.
(३) व (४) माहिती अधिकार अधिनियमाबाबत जनतेमध्ये जागृती झाली असल्यामुळे मोठ्या प्रमाणात द्वितीय अपीले दाखल होत आहेत ही वस्तुस्थिती आहे. सन २०१४ पासून दरवर्षी अंदाजे ४१, ००० द्वितीय अपीले दाखल होत आहेत.

राज्य मुख्य माहिती आयुक्त व अन्य राज्य माहिती आयुक्त यांना माहिती अधिकार अधिनियमान्वये द्वितीय अपिलांवर कार्यवाही करण्यासंदर्भात अर्धन्यायिक स्वरुपाचे अधिकार आहेत.

प्रलंबित अपिलांचा निपटारा करण्यासाठी मुख्यालयाच्या स्तरावर विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी सर्व खंडपीठांना प्रलंबित अपिलांचा निपटारा जलदगतीने करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

राज्य माहिती आयुक्त कार्यालयात विविध कारणांमुळे रिक्त झालेली राज्य माहिती आयुक्तांची पदे भरण्यात येतात अथवा अन्य माहिती आयुक्तांकडे कार्यभार सोपविला जातो.

---

### भाऊचा धक्का ते मांडवा अशी सागरी मार्गे रो-रो सेवा सुरु करणेबाबत

**(३९) १२२१९० (२६-०७-२०१८). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करण्याच्या दृष्टीने न्यु फेरी वार्फ (भाऊचा धक्का) ते मांडवा बंदर (ता. अलिबाग, जि. रायगड)) अशी माहे मार्च २०१८ पासून सुरु होणारी
रो-रो सेवा अद्याप सुरु करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रो-रो सेवेकरीता मांडवा येथे टर्मिनल बांधण्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे व हे काम किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१८) :** (१) होय.
(२) मांडवा येथे रो-रो जेट्टी, टर्मिनल इमारत व लाटरोधक भिंतीचे काम भौतिकदृष्टया पूर्ण झाले आहे.
(३) व (४) न्यू फेरी व्हार्फ ते मांडवा या जलमार्गावर रो-पॅक्स जलवाहतूक सेवा चालविण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने निविदा प्रक्रियाद्वारे मे.प्रोव्हीडेंशियल मल्टी ट्रेडींग प्रा.लि. या कंपनीची ऑपरेटर म्हणून निवड करुन त्यांना दिनांक ६.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये लेटर ऑफ अवॉर्ड दिले होते. परंतु, सदर कंपनी जलवाहतुकीसाठी सुयोग्य जलयान उपलब्ध करु न शकल्याने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दिनांक ३१.७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये त्यांचे लेटर ऑफ अवॉर्ड रद्द केले आहे.

त्यानंतर ऑपरेटरची निवड करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. निविदा सादर करण्यासाठी दोन वेळा मुदतवाढ देऊनही फक्त एकच निविदा प्राप्त झाल्याने सदर निविदेचा तांत्रिक देकार दिनांक ४.९.२०१८ रोजी उघडण्यात आला आहे.

---

**सोलापूरसह राज्यात मोठ्या प्रमाणात अवैध सावकारीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(४०) १२२४१५ (३०-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पोलीसांच्या होत असलेल्या दुर्लक्षामुळे तसेच गांभीर्याने पाहिले जात नसल्यामुळे सोलापूरसह राज्यात मोठ्या प्रमाणात अवैध सावकारी फोफावली असून वसुलीचा तगादा लावला जात असल्यामुळे राज्यात कर्ज घेतलेल्या शेतक-यांबरोबरच काही चित्रपट निर्माते तसेच काही गरजू व्यक्ती यांच्या आत्महत्या होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्या राज्यात मोठ्या प्रमाणात सुरु असलेली अवैध सावकारी व त्यांचा कर्ज वसुलीसाठी सतत लावण्यात येत असलेला तगादा रोखण्याबाबत व त्याचप्रमाणे सुरु असलेला अवैध सावकारीवर पोलीसांनी गांभीर्याने लक्ष द्यावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे. राज्यातील सोलापूर शहर यांच्या कार्यक्षेत्रात सन २०१८ मध्ये अवैध सावकारी संदर्भात ३ गुन्हे आणि चित्रपट निर्माता संदर्भात १ गुन्हा असे एकूण ४ गुन्हे दाखल झालेले आहेत. तसेच राज्यामध्ये अवैध सावकारी कायद्यांतर्गत एकूण दाखल गुन्हांची टक्केवारी खालील प्रमाणे आहे :-

| वर्ष | दाखल गुन्हे | उघडकीस गुन्हे | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २०१४ | ५१ | ५१ | १०० |
| २०१५ | ६९ | ६८ | ९८.५५ |
| २०१६ | १०२ | १०१ | ९९.०२ |
| २०१७ | १५२ | १५१ | ९९.३२ |
| मे, २०१७ अखेर | ४५ | ४४ | ९७.७८ |
| मे, २०१८ अखेर | ८५ | ८५ | १०० |
| **घट/वाढ** | **+४०** | **+४१** | **+२.२२** |

(२) अवैध सावकारी करणाऱ्यांविरुध्द शासनाने खालीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.:-

अ) सावकारीबाबत प्राथमिक कार्यवाही करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक व पोलीस यंत्रणा यांच्यामध्ये मासिक बैठक घेण्यात येते.

आ) सावकारीच्या गुन्ह्यांचे सखोल व परिपूर्ण तपासाकरिता स्वतंत्र सावकारी पथक कार्यरत असून, त्याद्वारे अर्जाची चौकशी व गुन्ह्यांचा तपास केला जातो.

इ) जिल्हा उपनिबंधक यांना सावकारीचे प्रकरणांमध्ये आवश्यक ते संपूर्ण सहकार्य केले जाते.

ई) जिल्हा उपनिबंधकांकडून सावकारी संबंधात अहवाल प्राप्त झाल्यास तात्काळ गुन्हा नोंदवून परिपूर्ण तपास केला जातो.

उ) आयुक्तालय स्तरावर पोलीस आयुक्त ते पोलीस निरिक्षक तसेच विविध शाखांमध्ये अनेक व्हॉट्सअप ग्रुप तयार करण्यात आलेले आहेत. या माध्यमातून देखील सावकारी विरुध्द जनजागृती करण्यात येत आहे.

ऊ) सावकारी संदर्भात पॅम्पलेंटद्वारे लोकांमध्ये जनजागृतीय करुन आव्हान केले जाते.

ए) विविध बैठकांमध्ये सावकारी कायद्याबाबत लोकांना माहिती देऊन गैरकायदेशीर सावकारीकरिता जिल्हा उपनिबंधक व पोलीसांना संपर्क साधणेबाबतचे आव्हान केले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विडी कामगारांना किमान वेतन देण्याबाबत

**(४१) १२२९०६ (२६-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी विडी कामगारांना २१० रुपये प्रतिदिन किमान वेतन देण्याची परिपत्रक जारी केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिपत्रकाला डावलून सुमारे ४ वर्षांनी त्याचा फेरआढावा घेण्यासाठी शासनाकडून समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीचा अहवाल सादर करण्यासह सदर परिपत्रक रद्द न करता या परिपत्रकांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

शासनाने दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी विडी कामगारांना २१० रूपये प्रतिदिन किमान वेतन देण्याची अधिसूचना जारी केली आहे,

(२) हे खरे नाही.

दि.१४.११.२०१४ रोजीची बिडी कामगारांच्या किमान वेतन पुनर्निर्धारणाची अधिसूचना डावलण्यात आलेली नाही. बिडी उद्योगातील मालक संघटनानी शासनाला दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दि.११.०५.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली समिती पुन:निर्धारित केलेला किमान वेतन दर निश्चितीची व मालकवर्गाच्या अपेक्षांचे तपासणी करेल

(३) समितीस अहवाल सादर करण्यासाठी ०३ महिन्याचा कालावधी दिलेला आहे. तसेच दि.१४.११.२०१४ रोजीची बिडी कामगारांच्या किमान वेतन पुनर्निर्धारणाची अधिसूचना रद्द करण्यात आलेली नसून तिची अंमलबजावणी चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुना जालना रोड, देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथे एका महिलेची बनावट दस्तऐवजांव्दारे केलेली फसवणूक**

**(४२) १२२९१४ (३०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुना जालना रोड, देऊळगावराजा (जि.बुलढाणा) येथील सौ.शोभा राजेंद्र खेडेकर यांची खोटे दस्तऐवज तयार करून कागदपत्राप्रमाणे खरेदी करून दिलेल्या भुखंडाचा ताबा न देता दुस-या नंबरचा भुखंडाचा ताबा देऊन फसवणूक केलेल्या दोषींवर कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २२ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) अर्जदार यांची तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्याचे पोलीस ठाणे सदर बाजार यांच्या तपासात चौकशी अंती निष्पन्न झाल्यामुळे तसे अर्जदार यांना कळविण्यात आले असून अर्ज निकाली काढला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जानवली (वाकाडवाडी) (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील खाजगी जमिनीवर एका विकासकाने बेकायदेशीरपणे अतिक्रमण केल्याबाबत**

**(४३) १२३०४८ (३०-०७-२०१८). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जानवली (वाकाडवाडी) (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील बावडेकर कुटुंबियांच्या वडिलोपार्जित असलेल्या खाजगी जमीन गट क्र.७५६/अ, क्षेत्र द.१०/९०, खाते क्र. १२५२ या जमिनीत श्री.सुभाष श्रीधर भोसले या विकासकाने गुंडांना हाताशी धरुन जमीन मालकांची परवानगी न घेता जेसीबीच्या सहाय्याने वृक्षांची तोड करुन रस्ता तयार करुन बंदीस्त व्दार लावले असल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी बावडेकर कुटुंबियांनी कणकवली शहरातील पोलीस स्थानिकात व पोलीस अधिक्षक, सिंधुदुर्ग यांच्याकडे गुंडागिरीविरुध्द दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून मा.लोकप्रतिनिधी व जमिन मालक यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरिक्षक व सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी विकासक व त्यांच्या गुंडाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) तक्रारदार यांच्या दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ च्या तक्रारीनुसार आरोपी विरुध्द गुन्हा रजि.नं.६०/२०१८ भादंवि कलम ४४७, ४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केशव शिवणी शिवारात, दुसरबीड, (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथे फसवणूक करणाऱ्या टोळीला अटक केल्याबाबत**

**(४४) १२३३१० (३०-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केशव शिवणी शिवारात, दुसरबीड, (ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा) येथे वनस्पती औषधीच्या सहाय्याने चौपट रक्कम करून देतो असे सांगून फसवणुक करणा-या टोळीला दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी वा त्या सुमारास अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून ७ आरोपींविरूद्ध किनगांवराजा , पोलीस स्टेशन येथे अप.क्र. ६६/१८ भादंवि कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करून ७ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्हा तपासावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सेलू (जि.परभणी) येथील उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या इमारतीबाबत

**(४५) १२४०८४ (३०-०७-२०१८). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) येथे उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कधीपासून आहे तसेच अद्यापपर्यंत कार्यालयासाठी स्वतंत्र मालकीची इमारतीची निर्मिती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कार्यालयासाठी नवीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१८) :** (१) होय.
(२) उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, सेलू येथे सन १९७४ पासून कार्यरत आहे. उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या इमारतीसाठी जमीन अधिगृहीत केलेली आहे.
(३) शासन निर्णय दिनांक ०२.०२.२००८ अन्वये सेलू-परभणी येथे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी रु.१५,९१,०००/-इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सन २००९ मध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून रु.१२,००,०००/-इतके अनुदान प्राप्त झाले. सदर निधीमध्ये कार्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले नाही. तद्नंतर पोलीस अधीक्षक, परभणी यांच्या २४.९८ लक्षच्या सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर खर्चाचे अंदाज हे सन २००८-०९ च्या दरसूचीवर आधारीत होते. शासनाने अद्यावत दरसूचीवर खर्चाचे अंदाज सादर करण्यास पोलीस महासंचालक यांना कळविले असता सार्वजनिक बांधकाम विभागाने रु.१,३२,५९,४६६/- इतकी रक्कम आवश्यक असल्याचे कळविले असून अंदाजपत्रक अद्याप प्राप्त झालेले नसून त्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे माळवंडी (ता. जि. बुलढाणा) येथे पडलेल्या दरोड्यातील मुख्य आरोपींना पकडण्याबाबत

**(४६) १२४३३५ (३०-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे माळवंडी (ता. जि. बुलढाणा) येथे दिनांक २५ मार्च २०१८ रोजी वा त्या सुमारास दरोडा पडून चोरांनी सोने, चांदी इ. सुमारे रुपये ११ लाख किंमतीचे ऐवज पळविल्याचे तसेच सर्व कुटूंबातील सदस्यांना धारदार शस्त्राने मारहाण केल्यावरून स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या निवेदनावर मा. राज्यमंत्री गृह विभाग यांनी दिलेल्या आश्वासनानुसार मुख्य आरोपी माहे मे, २०१८ पर्यंत पकडण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरोडेखोरांपैकी मुख्य दोन आरोपी अद्यापपर्यंत पकडण्यात पोलीस प्रशासनाला अपयश आल्यामुळे कुटूंबातील सर्व सदस्यांनी स्थानिक लोकप्रितिनिधी व शासनाकडे आत्महदन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य आरोपी पकडण्यासाठी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१८) :** (१) स्टेशन रायपूर येथे दिनांक २५/३/२०१८ रोजी फिर्यादी श्री.राजु मधुकर कवळकर, वय ३६ वर्ष व्यवसाय सोनार, रा.माळवंडी, ता.जि. बुलढाणा यांनी माळवंडी पो. स्टे. येथे त्यांच्या घरात दिनांक २५/३/२०१८ च्या रात्री ३.३० वाजता ७ ते ८ अनोळखी २५ ते ३० वयोगटातील इसमांनी तोडून घरात प्रवेश करुन घरातील फिर्यादीचे कुटुंबातील सदस्यांना काठीने जबरीने मारहाण करुन व चाकूचा धाक दाखवून सर्वांच्या अंगावरील सोने, कपाट तोडून २५० ग्रॅम सोन्याचे दागीने व ७ किलो चांदी असे १०,५१०००/- रुपयाचे व रोख रक्कम ३५,०००/- असा एकूण १०,८६,०००/- रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेल्याबद्दल गुन्हा गु. र. नं.४४/२०१८ वर कलम ३९५, ३९७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात १२ आरोपी निष्पन्न झाले असून १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. यापैकी ५ आरोपी विधी संघर्षग्रस्त बालक आहेत.

(२) व (३) फिर्यादी श्री.राजु मधुकर कवळकर यांनी गुन्ह्यातील मुख्य अरोपींना अटक करुन मुद्देमाल परत मिळावा म्हणून आत्मदहन करण्याचा ईशारा दिनांक ६/६/२०१८ रोजी दिला आहे. गुन्ह्यातील दोन्ही मुख्य आरोपींना दिनांक १८/६/२०१८ रोजी अटक करण्यात आल्याने फिर्यादी यांनी आपला आत्मदहनाबाबतचा अर्ज मागे घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसंबंधातील शासननिर्णयाबाबत

**(४७) १२४५१७ (३०-०७-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णय अनुकंपा १२१७ प.क १०२/ आठ मंत्रालय, मुंबई दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ नुसार अनुकंपा यादी मधील ४५ वर्षापर्यंत उमेदवारांना नियुक्ती अनुज्ञेय असुन ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांचे नांवे प्रतिक्षा सूचीतून काढण्यात येईल असे शासन निर्णयात नमुद असल्यामुळे अनुकंपा कुटूंबातील पात्र व्यक्तीला ४५ वर्षानंतर नोकरी मिळणार नसल्याने त्यांच्या कुटुंबावर अन्याय होणार असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रतिक्षा यादीत नावाची एकदा नोंद झाल्यानंतर त्याऐवजी अन्य वारसदारांचे नाव पुन्हा घेतली जात नाही असेही उक्त निर्णयात नमूद असुन अनुकंपा यादीत वारसदारांने नांव समाविष्ट करणेबाबत पुन्हा एकदा संधी अनुकंपा कुटूंबाला देण्याबाबत धोरणात्मक निर्णय होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :** (१), (२) व (३) शा.नि.दि.२६.१०.१९९४ अन्वये अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतची सुधारित योजना विहीत करण्यात आली. त्यामध्ये वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रकांन्वये दुरुस्त्या करण्यात आल्या व नवीन तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या. सदर तरतुदी एकत्रित स्वरुपात नसल्यामुळे अनुकंपा नियुक्तीबाबतची कार्यवाही करताना अडचणी निर्माण होतात व निर्णय घेताना विसंगती निर्माण होण्याची शक्यता होती. यास्तव अनुकंपा नियुक्ती योजनेसंबंधी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय/ परिपत्रकांचे एकत्रीकरण करुन सर्वसमावेशक आदेश शा.नि. अकंपा-१२१७ /प्र.क्र.१०२/ आठ, दि.२१.०९.२०१७ नुसार निर्गमित करण्यात आले आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.दि.०६.१२.२०१० अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी असलेल्या ४० वर्षे कमाल वयोमर्यादेत वाढ करुन ती ४५ वर्षे इतकी करण्यात आली आहे. त्यामुळे प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्षे पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतीक्षासूचीतून काढून टाकण्याबाबत तरतूद आहे. याबाबत वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यावर अनुकंपाधारकाचे नाव यादीतून वगळल्यास त्याऐवजी अन्य वारसदाराचे नाव समाविष्ट करण्याबाबत कामगार संघटनेचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर मागणी अनुकंपा नियुक्ती धोरणाचा आढावा घेण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीसमोर विचारार्थ आहे.

---

**मे. जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट प्रा. लि. कंपनीने करारानुसार प्रवासी जेट्टी बांधून न दिल्याबाबत**

**(४८) १२५५३५ (२६-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गृह विभागाच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार गावकऱ्यांना सोयी सुविधा मिळण्याच्या दृष्टीने बंदर विकासकाने एक जेट्टी प्रकल्पाच्या हद्दीच्या बाहेर स्वखर्चाने बांधून द्यायची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट प्रा. लि. कंपनीने सन २००९ साली महाराष्ट्र शासनाशी जयगड बंदर विकसित करण्याचा करार केल्यानंतर नऊ वर्षे लोटली तरी गावक-यांना सोयी सुविधा मिळण्याच्या दृष्टीने सदर कंपनीने प्रकल्पाच्या हद्दीबाहेर स्वखर्चाने प्रवासी जेट्टी बांधून दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनीधी यांनी लक्ष वेधल्यानंतर दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी महाराष्ट्र शासनाचे तत्कालीन मुख्य सचिव श्री.स्वाधीन क्षत्रिय यांनी अप्पर मुख्य सचिव (परिवहन) गृह विभाग यांना कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने दिनांक २९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास कस्तुरीमृग फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.अनुपम कांबळी यांनी परिवहन व बंदरे विभागाच्या प्रधान सचिवांकडे तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कंपनीचा शासनाशी असलेला करारनामा संपुष्टात आणण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची सध्य:स्थिती काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०९-२०१८) :** (१) व (२) होय.

तथापि, सदरहू शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१० नुसार निर्गमित करण्यात आलेले सुधारित बंदर विकास धोरण-२०१० हे नवीन ग्रीनफिल्ड बंदर प्रकल्पांकरीता लागू आहे. मे.जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि. यांच्याशी बंदर विकासाबाबत दिनांक २४.०६.२००८ रोजी करारनामा स्वाक्षांकीत करण्यात आलेला असल्यामुळे त्यांना या धोरणातील तरतूदी लागू नाहीत.

(३) व (४) होय.

(५) मे.जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि. यांच्याशी बंदर विकासासाठी दिनांक २४.०६.२००८ रोजी म्हणजेच सुधारित बंदर विकास धोरण-२०१० जाहीर होण्यापूर्वीच करारनामा स्वाक्षांकीत करण्यात आला असल्यामुळे, सुधारित बंदर विकास धोरण-२०१० मधील सवलती वगळता हे धोरण त्यांना लागू नाही. त्यामुळे, मे.जेएसडब्ल्यू जयगड पोर्ट लि. यांनी बंदर प्रकल्पाच्या हद्दीच्या बाहेर स्वखर्चाने प्रवासी जेट्टी बांधण्याचा प्रश्न येत नाही. त्यामुळे करारनामा संपुष्टात आणण्याचा प्रश्न उद्भभवत नाही.

सद्य:स्थितीत, जयगड बंदर हद्दीमध्ये जयगड ते तवसाळ, कुडली ते जांभारी, पडवे ते सैतावडे, भातगांव ते करजुवे अशी प्रवासी जलवाहतूक सुरु आहे. जयगड बंदर हद्दीबाहेर जेएसडब्ल्यू कंपनीमार्फत जेट्टी बांधून मिळणेबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून कोणतीही मागणी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे प्राप्त झालेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग यांनी ऑनलाईन लॉटरीच्या अब्जावधी रुपयांच्या गैरव्यवहाराच्या चौकशीचा अहवाल**

**(४९) १२५७०७ (२०-०७-२०१८). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग यांनी माहे नोव्हेंबर, २००७ मध्ये वा त्या दरम्यान ऑनलाईन लॉटरीच्या अब्जावधी रुपयांच्या गैरव्यवहाराच्या चौकशीचा अहवाल पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लॉटरी कायद्यातील तरतूदीनुसार लॉटरी तिकीट विक्रीचे उत्पन्न राज्याच्या लोकलेख्यात जमा करणे बंधनकारक असूनही प्रत्यक्षात सर्व रक्कम खाजगी व्यवस्थापनाच्या खात्यात जमा करण्यात येत असल्याचा निष्कर्ष सदर अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लॉटरी कायद्यातील तरतूदीनुसार प्रत्येक राज्याच्या राज्य लॉटरीच्या सोडतीचे ठिकाण हे त्याच राज्यामध्ये स्थित असणे बंधनकारक असूनदेखील प्रत्यक्षात सदर सर्व लॉटरीचे व्यवस्थापन हे संगणकाद्वारे अथवा इंटरनेटद्वारे करण्यात येत असल्याने अनेकवेळा सदर संगणकाचा मुख्य सर्व्हर हा राज्याबाहेर ठेवून केंद्र शासनाच्या कायद्यातील मुळ तत्वांचेच खाजगी लॉटरी व्यवस्थापनाद्वारे पायमल्ली होत असल्याचा आक्षेप सदर चौकशी अहवालात नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अधिकारी यांनी लॉटरी कायद्याचे उल्लंघन करून नागरिकांची फसवणुक केल्याचा आक्षेप अहवालात नमूद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, लॉटरी कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन केल्याप्रकरणी अहवालात नमूद आक्षेपांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) ऑनलाईन लॉटरीच्या गैरव्यवहाराच्या चौककशीच्या अंतिम अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्वेतील तिसगाव नाका व काटेमानिवली येथे वाहतूक नियंत्रक पोलीस नियुक्त करण्याबाबत**

**(५०) १२६३४४ (०४-०८-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण पूर्वेतील तिसगाव नाका व काटेमानिवली येथे वाहनाची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते यामुळे येथे नेहमी नागरिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी वाहतूक नियंत्रक पोलीस नियुक्त करण्याबाबत अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून शासनाने वाहतूक नियंत्रक पोलीस नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कल्याण वाहतूक विभागाशी पत्रव्यवहार केलेला आहे.
(२) कल्याण पुर्व परिसरातील वाहतूक नियमनासाठी स्वतंत्र कोळसेवाडी वाहतूक उपविभाग कार्यरत असून तेथे पोलीस निरीक्षक दर्जाचे प्रभारी अधिकारी नेमणुकीस आहेत. तसेच एक सहायक पोलीस निरीक्षक व २६ पोलीस कर्मचारी आणि १९ ट्रॅफिक वार्डन यांची नेमणूक करण्यात आली आहे. काटेमानिवली येथे वाहतूक नियमनाकरीता सकाळी ०९.०० ते रात्रौ २१.०० वा. पर्यंत एक पोलीस अंमलदार व त्यांचे मदतीस एक ट्रॅफिक वार्डन अशी नेमणूक करण्यात येते. तसेच पुणे लिंक रोडवर तिसगांव नाका येथे वाहतूकीच्या प्रमाणानुसार आवश्यकतेप्रमाणे वाहतूक नियमनास पोलीस अंमलदार नेमण्यात येतात. पुणे लिंक रोडवरील इतर चौक व शाळा परिसरात शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत वाहतूक पोलीसांची बिट मार्शल नेमण्यात येते तसेच पोलीस अधिकारी देखील पेट्रोलिंग करतात. अशाप्रमाणे कार्यवाही करुन काटेमानिवली आणि तिसगांव नाका व परिसरातील वाहतूकीचे दैनंदिन नियमन करण्यात येऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यांत येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.